## नि. ३५ व ३७ वरील एकत्रित आदेश

१. प्रतिवादी यांनी निशाणी ३५ कडे अर्ज दाखल करुन वादी यांनी १८ वर पारित झालेल्या आदेशाप्रमाणे आदेश क्रमांक ३ व ५ मधील न्यायालयीन निर्देशाचे पालन केले नाही म्हणून वादीचा दावा नामंजूर करावा अशी मागणी केलेली आहे. सदर अर्जास वादीने निशानी ३६ कडे म्हणने  दाखल करून त्यास विरोध दर्शविला. वादीच्या कथनानुसार वादी क्रमांक ४ हेच संपूर्ण दाव्याचे कामकाज पाहतात. ते व्यवसायाने शिक्षक आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षेत त्यांना पर्यवेक्षक म्हणून काम दिले होते त्यामुळे ते दावे कामी हजर राहून निशाणी १८ वर दिले निर्देशाचे पालन करू शकले नाही. पुढील तारखेस ते न चुकता हजर राहतील.

२. यानंतर वादीने आज रोजी निशाणी ३७ कडे अर्ज देवून निशाणी अठरा वरील आदेशाप्रमाणे पुर्तता करण्याची परवानगी मागितली. सदर अर्जाच्या पाठीमागे स्वतःचे म्हणणे दाखल करून प्रतिवादींनी त्यास विरोध दर्शविला व कथन केले की ज्या कारणास्तव त्यांना निशाणी १८ वरील आदेशाच्या पुर्ततेस  विलंब केला त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे वादीने प्रकरणात दाखल केलेली नाही. वादी व स्वतःच्या दाव्याबाबत जागृत नाही. दिनांक २७.०१.२०२५ पासून नि.१८ वरील आदेशाची पूर्तता वादीने केलेली नाही. निशाणी ३५ कडे प्रतिवादीने अर्ज दिल्यानंतरही वादिने त्याबद्दल पूर्तता केलेली नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह फेटाळावा ही मागणी यांनी केली.

३. वादी व प्रतिवादी तर्फे वकीलांना ऐकले. नि. ३५, ३६, ३७ कडील अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दावेचे रेकॉर्ड तपासले.

४. वादीनी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता, हक्कज्ञापनाकरिता व कायम मनाईकरता दाखल केलेला आहे. नि.१८ कडे प्रतिवादी यांनी दि.प्र.सं.आ.७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल

केला होता व तो दि. २७.०१.२५ रोजी नामंजूर करताना या न्यायालयामार्फत वादीस वाटपाच्या व स्वतंत्र कब्जाच्या दादीकरिता आवश्यक तो कोर्ट फी स्टॅंम्प पुढील नेमले तारखेस न चुकता भरणेबाबत व दाव्याची डुप्लीकेट प्रत ही देणेबाबत तसेच पुर्तता न केल्यास दावा खारीज होईल याबाबत आदेशीत केले आहे. आदेशानंतरची पहीली तारीख ही १७.०२ .२०२५ अशी होती. सदर दिवशी वादीने स्वतहून नि. १८ ची पुर्तता केली नाही.

५. त्यामुळे वादिनी निशाणी ३५ कडे अर्ज दाखल करून वादीचा दावा रद्द करण्याची विनंती केली. सदर अर्जास नि.३६ कडे म्हणणे दाखल करून वादीने पुन्हा एकदा निशाणी १८ प्रमाणे पूर्तता करण्याची परवानगी मागितली. परंतू, पुढील तारीख दि.२१.०४.२५ रोजी ही वादीने पूर्तता केली नाही. यानंतर वादीने आज स्टॅम्प ड्युटी भरण्याकरिता चा निशाणी ३७ कडे अर्ज दाखल केला. दिनांक १७.०२.२५ ते दिनांक ०७.०७.२५ या कालावधीत वादीस निशाणी १८ वरील आदेशाच्या पूर्ततेकरिता का विलंब झाला ते कारण दाखविणारे कागदपत्र वादीने प्रकरणात दाखल केलेले नाही. तसेच वादिने अर्जातील कथनाकरिता स्वतःचे शपथ पत्र ही दिलेले नाही. यावरून वादीने जाणून बुजून निशाणी १८ वरील आदेशाची पूर्तता करण्यास विलंब केलेला आहे की बाब समोर येते.

६. निशाणी १८ वरील आदेशामध्ये पूर्तता न झाल्यास दावा रद्द होईल असा स्पष्ट उल्लेख नमूद आहे. रेकॉर्डनुसार वादीने प्रत्यक्षात पुर्तता केली नसली तरी नि.३६ कडील त्याचे म्हणणे व नि.३७ कडील अर्ज पाहता तो पुर्तता करणेस तयार आहे हे त्याने समोर आणलेले आहे. दि. प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार न्यायाचे हेतूस्त्व जेणेकरून प्रकरणात न्याय होईल असे आवश्यक ते आदेश् पारीत करण्याचे अधिकार न्यायालयास प्राप्त आहेत. वादी हा समोर पुर्तता करण्याकरिता परवानगी मागत असताना त्याने पुर्ततेस ५ महिने विलंब केला या कारणावरुन त्याचा दावा रदद करण्याने केवळ वादीच्या कायदेशीर हक्कांचे नुकसान होईल. दावा रदद न करण्याने प्रतिवादीच्या हक्कांचे नुकसान होईल अशी स्थिीत दिसत नाही. दिनांक १८.०२.२०२५ ते आजपर्यंत वादीने जवळजवळ पाच महिन्याचा विलंब पूर्तते करिता लावलेला असल्याने त्याकरिता रक्कम रुपये १०००/- खर्च लावून वादीस तो भविष्यात पुन्हा

अशा प्रकारे वागणार नाही याबाबत त्यास सुचित करुन वादीस निशाणी १८ वरील आदेशाची पूर्तता करणे कामी परवानगी देणे योग्य होईल असे न्यायालयास वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

अ. अर्ज रक्कम रू. १०००/- खर्चावर मंजूर करणेत आला.

ब. वादीने सदरचा खर्च प्रतिवादीस आज देवून नि.१८ प्रमाणेची आवश्यक ती पुर्तता तात्काळ करावी.

URMILA PARASHRAM KOLI

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2025.07.07 18:15:34 +0530

दि. ०७.०७.२०२५

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर